दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १३ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये







## पुस्तक परीक्षण

# द लॉस्ट बॅलन्स
## उद्ध्वस्त माणसांची गोष्ट

'द लॉस्ट बॅलन्स' ही कवी, चित्रकार रामदास खरे यांनी लिहिलेली कादंबरी, ही कादंबरी इंग्लिश शीर्षकामुळे मला थोडी वेगळीच वाटली. सुरुवातीच्या पहिल्याच पानावर 'त्या दुहेरी अग्नी कांडात आधी भ्रमिष्ट झालेल्या नंतर पोळून निघालेल्या आणि मग यथावकाश विझून गेलेल्या अश्राप जीवांना समर्पित' अशी अर्पण पत्रिका आहे.

रत्नावली को-ऑपरेटिव्ह बँक नावाच्या काल्पनिक अशा कथित रित्या बुडालेल्या बँकेबद्दल ही कादंबरी आहे .बँकिंग व्यवहार संदर्भात बरेच उल्लेख आणि बरीच माहिती या पुस्तकात असल्यामुळे बँकेत काम करणाऱ्या अथवा बँकेची संबंधित,अथवा अर्थव्यवहाराशी संबंधित लोकांना, तो आघात, ती घटना ओळखीची वाटते.लेखकाची कथन शैली रोचक आहे.सामान्यतः सगळ्यांना ती कादंबरी आवडत असली, तरी काही बाकीच्या लोकांना ती क्लिष्ट वाटू शकते .

मनोगतात लेखक म्हणतात की ,"कविता, कथा, व्यक्ती चित्रण अशा साहित्य प्रकारात लिहिणारा मी कादंबरीचे बांधकाम करणे आपल्याला जमेल का ? ढाचा कोसळणार तर नाही ना !अशी हुरहुर मनात होतीच." पण त्यांनी ही कादंबरी त्रोटक न वाटता, उत्सुकता निर्माण करेल ,अशी छान रचून लिहिली आहे हे महत्वाचे.

कादंबरीचे प्रेरणे संदर्भात लेखक लिहितात की ज्येष्ठ कादंबरीकार श्री ना पेंडसे यांच्या 'एक मुक्त संवाद उद्याच्या कादंबरीकारांशी' हे पुस्तक मार्गदर्शकाच्या नात्याने समोर ठेवून त्यांनी कादंबरी लेखन केलं आहे .कादंबरी कडून अपेक्षा काय ?तर साक्षात जीवन! जे आहे तसे दाखवा, अशा रीतीने या घडलेल्या सर्व घटना संपूर्ण काल्पनिक आहेत.तरीही त्या खऱ्या वाटतात. ( बुडालेल्या विविध बँकांच्या काही बातम्या आपण वृत्तपत्रात वाचल्या असतीलच ) त्या बऱ्याच समकालीन लोकांच्या बाबत त्या घटना ऐकल्या वाचल्याचे स्मरणात आहेत. शिवाय माझ्या एका मैत्रिणीच्या मिस्टरांची बँक अशीच अचानक बंद झाल्यामुळे त्यांचे हाल वगैरे मी ऐकून आणि तिच्या जीवनातून, तिच्या वर्णनातून बघितले आहेत, ऐकले आहेत.

लेखक महाशय म्हणतात की ,डोक्यात रोज काहीबाही साचू लागले आणि एक दिवस ती विलक्षण घुसमट डोक्यातून कागदावर निथळायला सुरुवात झाली.

कादंबरीचे मुखपृष्ठ रामदास खरे यांनी स्वतः बनवले आहे .ज्यात खूप सूचक अर्थ सामावला आहे .

'फॅन्सी रिटर्न्स नेव्हर रिटर्न 'असं म्हटलं जातं. म्हणजे खूप मोठ्या व्याजदराची किंवा एखाद्या स्कीमची ,अधिक फायद्याची अपेक्षा केली की तो फायदा येत नसतो. उलट तेव्हा आपले पैसे बुडतात. आम्ही जेव्हा नोकरीवर होतो तेव्हा दर महिन्याला एक ना एक वित्त संस्था बुडालेली असायची .तरीही अशा संस्थांचे अमिषाचे सापळ्यात फसून त्यात गुंतवणूक करुन लोक व्यवहार करत राहतात हे एक नवलच आहे. पोण्झी स्कीम्स ,दोन वर्षात पैसे डबल करणे, अशा वेगळ्या वेगळ्या व्यवहारांमध्ये लोक पैसे गुंतवतात आणि फसतात.

सर्वसामान्य माणसांना किमान स्थैर्यपूर्ण शाश्वत सरळ मार्गी जीवन अपेक्षित असतं .पण अचानक स्वतःची काही चूक नसताना जगण्याचा आर्थिक पाया डळमळीत होतो आणि मग सुरू होतो एक अधांतरी प्रवास. अकल्पित संकटाने विश्वास हरवतो .या सगळ्या घटनेमध्ये भरडला जातो तो सामान्य माणूस. वित्तीय संस्थांवर आधी बंधन येतात. नंतर विमा कंपनीच्या नियमानुसार रकमेच्या पैकी थोडेफार पैसे मिळतात .

अचानक एक दिवस बँक बंद होते आणि आपले कष्टाचे पैसे आपल्याला आता मिळू शकत नाही, ही गोष्ट फार धक्कादायक असते. कादंबरीत कुणाला हार्टचे ऑपरेशन साठी रक्कम हवी असते. तर कुणाला अन्य काही कारणाने पैसे हवे असतात, जे बँकेतील कर्मचारी देऊ शकत नाही .कारण पैसे काढण्यावर निर्बंध हे वरच्या संस्थेकडून आलेले असतात. त्यावेळी बँकेच्या कर्मचाऱ्यांना नाहक त्रास भोगावा लागतो. ग्राहकांना ही त्रास भोगावा लागतो. अस्वस्थ आणि सुन्न करणारी ही कादंबरी आहे. लॉस्ट बॅलन्स म्हणजे एका तोल ढळलेल्या सामान्य माणसांची विलक्षण कहाणी आहे .

अर्थकारण हे सामान्य माणसाला फारसं कळत नसतं. सामान्य माणूस आपली पुंजी बँकेच्या हवाली करून निर्धास्त बसतो. अनेक बारकावे बँकांचे अंतस्थ कारभाराचे तपशील या पुस्तकात आहेत. वैयक्तिक आयुष्यातील ताणेबाणे नोकरीतील अस्वस्थता यांचे प्रभावी चित्रात केले आहेत.

'बँकिंग सारख्या एरवी काहीशा रुक्ष वाटणाऱ्या क्षेत्राचे हे समकालीन वास्तव ,डोळे उघडणारे दर्शन घडवते.' असे लेखिका, समीक्षक डॉ. वंदना बोकील कुलकर्णी यांनी ब्लर्ब स्वरूपात लिहिलेलं आहे.

ग्राहकांचे बाबत सगळ्यात पहिलं काय बुडतो तो पैसा आणि दुसऱ्यांदा काय बुडतो तर विश्वास! नोकरी व्यवहार धंदा यामध्ये कुरघोडी नवे उद्योग छुपे उद्योग नवीन व्यक्ती नवीन राज्य अशा प्रकारे काही गोष्टी घडत असतात .काही महत्त्वाचे निर्णय घाईने अथवा दबावाखाली देखील घेतले जातात. तर काही निर्णयांच्या बाबतीत उगाचच सावकाश आणि सावधपणे काम केलं जातं . व्यक्ती तितक्या प्रकृती असतात आणि बँकिंग व्यवहारात आपल्याला त्याचा अनुभव येतो.

एनपीए संबंधात तर कर्ज दिया दर्द लिया ,अशीच वेळ शाखा मॅनेजरवर येत असते. तो प्रसंग वाचताना जणु तो अनुभव आपण स्वतः घेत आहोत असे वाटते.

या रत्नावली बँकेच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने निर्णय घेतला. प्रशासकांनी आधी मर्जींगचे आमीष दाखवले आणि नंतर जबरदस्तीने व्ही आर एस लावून बँक खाली केली .बँक धक्क्याला लावली. असं वाक्य आहे. [पान 268]कितीतरी गिरणी कामगारांचे पण आपण असे हाल बघितले. गिरण्या बंद झाल्यावर कामगारांचे जसं घडलं तसंच या बँकेच्या स्टाफ च्या बाबतीत देखील घडलं असावं ,असे लेखक लिहीतात.अगदी रत्नावली बँकेचा उरला सुरला स्टाफ सावल्यांसारखा इथं तिथं हळूहळू रेंगाळला पांगला आणि यथावकाश अदृश्य झाला. या वाक्याने कादंबरी संपते

या पुस्तकाला महत्वाचे पुरस्कार लाभले आहेत. ही कादंबरी लेखकाच्या पारदर्शी, रोचक शब्द शैलीमुळे वाचनीय झाली आहे



: शुभांगी पासेबंद
द लॉस्ट बॅलन्स ( कादंबरी)
लेखक : रामदास खरे
पृष्ठे :२७२, मूल्य: ₹ ५००/ -
प्रकाशक: अनघा प्रकाशन,ठाणे.

# शहापूरचं पाण्यासाठी दातृत्व

मुंबईपासून दिडशे किलोमीटर अंतरावर ठाणे उपनगरात शहापूर तालुका आहे. महाराष्ट्रात धरणांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या या तालुक्यात भातसा,तानसा,वैतरणा मध्य वैतरणा,ही मुंबईची तहान भागविणारी प्रमुख धरणं आहेत. राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाची साक्ष सांगणारा माहुली गड येथे दिमाखात उभा आहे.वाल्मिकी ऋषींची समाधी असा ऐतिहासिक ठेवा आहे. घनदाट जंगल सहयाद्री पर्वतरांगा तानसा अभयारण्य असलेला व मुंबई नाशिक महामार्गाच्या अगदी कडेला वसलेला हा शहापूर तालुका तीसरी मुंबई म्हणून आता नावारुपाला येत आहे.मध्य रेल्वेच्या लोहमार्गावरील शेवटचे टोक असलेली आसनगाव व कसारा ही रेल्वे स्थानकं येथे आहेत.



मुंबई महानगर व त्यापाठोपाठ उपनगरातील,ठाणे,डोंबिवली,कल्याण,अंबरनाथ,उल्हासनगर,बदलापूर ही शहरं वाढत्या लोकवस्तीनं फुल्ल झाली आहेत.तर येथील घरांच्या किमतीही गगनाला भिडलेल्या आहेत. या शहरांत घर घ्यायचं तर सर्वसामान्य मध्यम वर्गीय लोकांच्या आवाक्याच्या बाहेर असल्यानं या शहरातील लोकांचे गर्दीचे लोंढे,वासिंद,आसनगाव,शहापूर याठिकाणी झेपावले आहेत आणि तेथेच स्थिरावले आहेत.हजारो स्थलांतरीत लोकांनी शहापूरला पसंती दिली आहे.यामध्ये चाकरमानी कुटुंब अधिक दिसत आहेत.एकिकडे नागरीकरण वाढत असल्याने शहापूरचं शहरीकरण होताना जरी दिसत असलं तरी या तालुक्याचा पाहिजे तसा विकास झालेला दिसत नाही.अनेक नागरी समस्यांच्या कचाट्यात हा तालुका अडकलेला दिसतो आहे.शहापूर नगरपंचायत सोडली तर एकूण ११० ग्रामपंचायती व तीन लाख लोकांचा भार हा तालुका सांभळतो आहे. ठाणे जिल्हयाच्या नकाशावर दुर्गम व आदिवासी बहुल तालुका म्हणून शहापूरची नोंद आहे.जवळपास पन्नास टक्के समाज हा आदिवासी असून हा समाज हा डोंगर,पठारावर वास्तव्य करीत आहे.म ठाकूर,व क ठाकूर हा प्रामुख्याने आदिवासी समाज येथे दिसून येतो.तर थोड्याफार प्रमाणावर शहापूर तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या तानसा,अघई या परिसरात वारली तर काही प्रमाणात कोळी समाज आहे.कुणबी,आगरी , समाजा नंतर दलित व मुस्लीम समाजाची बोटावर मोजण्या इतकी अगदी पंधरा टक्के लोकसंख्या पाहण्यास मिळते.आदिवासी समाजासाठी शहापूर हा राखीव विधानसभा मतदारसंघ असल्याने येथे आदिवासी आमदार आहे. आदिवासी समाजाचं जरी नेतृत्व येथे असलं तरी फारशी प्रगती आदिवासी समाजाची झालेली आहे.असे मुळीच चित्र येथे दिसत नाही.आजही वासिंद, किन्हवली,डोळखांब,खर्डी,कसारा या दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी.हाच आदिवासी पोटापाण्यासाठी कामाच्या शोधात शहराकडं नाका कामगार म्हणून उभं राहत आहे.इमारतीच्या कामांसाठी वीटभट्ट्यांवर मजूरीसाठी स्थलांतरीत होत आहे.तर काही आदिवासी जंगलातील पळसाची पाने,फुले,कंदमुळे,रानमेवा विकून तसेच मासेमारी करुन तर टोपल्या विकून आपल्या कुटुंबाचा गाढा चालवित आहेत.धरणाचा तालुका अशी ओळख असलेल्या शहापूरनं मुंबई ,ठाणे या महानगरांसाठी आपलं नेहमीच योगदान दिलं आहे. यासाठी प्रसंगीआदिवासी समाजानं स्वतःमात्र कठीण परिस्थितीला तोंड देत हाल अपेष्टा सहन करत आहेत. पण कोणालाही खरं वाटणार नाही पण ही वस्तुस्थिती आहे.व तितकचं वास्तवही आहे.डोळ्यादेखत हजारो लिटर्स पाणी जलवाहिन्यातुन शहरांसाठी जात असताना हंडाभर पाणी मिळवण्यासाठी पाण्यासाठी दाहिदीशा रानोरानं भटकंती स्थानिकांना वर्षानुवर्षे करावी लागते आहे.धरणा काठावरील हे पाण्याचे हे दुर्भिक्ष मायबाप सरकारला पण दिसत आहे.पण मुंबई व ठाणे महानगरांना जर जगवायचं असेल तर शहापूरच्या जलाशयातील पाणी घेतल्या शिवाय दुसरा पर्याय सरकारपुढे नाही.शहरातील करोडो लोकांची मदार ही शहापूरातील धरणावंर आहे.आपली घागर रिकामी ठेऊन महानगरातील लोकांची तहान भागली पाहिजे मुंबई जगली पाहिजे.असा मनाचा मोठेपणा दाखवत अग्रक्रमाने आपले अमुल्य असे योगदान देणारा म्हणजे शहापूर तालुका होय अशी ओळख शहापूरची आहे.येथील



भातसा,तानसा,मोडकसागर, मध्यवैतरणा,या धरणांतून प्रतिदिन ३ हजार ९०० एमएलडी इतके पाणी मुंबई ,व ठाणे शहरांना पुरविले जाते यात सर्वाधिक भातसा धरणातून प्रतिदीन जवळपास २००० एमएलडी पाणी मुंबई, महानगराला पुरविण्याची जबाबदारी भातसा जलाशयावर आहे. ही सगळी धरणं बांधली गेली ती शहापूर तालुक्यात ब्रिटीश सरकारने भविष्यात पाण्याची गरज पाहता दिडशे किलोमीटर अंतरावरून डोंगर दऱ्या खोऱ्यांच्या व घनदाट जंगल असल्याने मान्सून काळात सर्वाधिक पर्जन्यमान असलेल्या शहापूर तालुक्यात दगडी बांध घालून तानसा,मोडकसागर ही धरणं मोठ्या कौशल्याने उभी केली आहेत मुंबई ला पाणी पुरविण्यासाठी धरणांची निर्मिती करावी लागेल तरचं या महानगरांची तहान भागविली जाईल ही दूरदृष्टी ब्रिटिशांची होती. म्हणून सरकार मधील अभियंत्यांनी धरण बांधून यातील जलसाठा अडवून तो दिडशे किलोमीटर अंतरावर मुंबईत पोहचवण्यासाठी आपले अजब कौशल्य पणाला लावले.यासाठी त्यांनी महाकाय लोखंडी जलवाहिन्या टाकल्या ही अफलातून युक्ती ब्रिटीश सरकारने लढवली होती.स्वातंत्र्या नंतर मुंबई महापालिका अस्तित्वात आली. पुढे या धरणाच्या पाण्याचं योग्य नियोजन मुंबई महापालिकेनं ठेवलं यासाठी जल विभागाची निर्मिती झाली.वाढत्या मुंबई महानगराच्या लोकसंख्येचा विचार करता व पाण्याची निकड पाहता गरजेनुसार मध्यवैतरणा या धरणाची नव्याने बांधणी मुंबई महापालिकेने केली तर आणखी दोन जलवाहिन्यांची निर्मिती करण्यात आली आहे. तीसऱ्या जलवाहिनी टाकण्याचे काम ही युध्दपातळीवर सुरु आहे.यासाठी करोडो रुपये महापालिका आपल्या तिजोरीतून खर्च करीत आहे.केवळ मुंबईला पाणीपुरवठा करणे हे एकमेव ध्येय महापालिकेचे आहे.जसे मुंबई महापालिकेचे पाण्याचे नियोजन आहे तशाच प्रकारे महाराष्ट्र सरकारच्या पाटबंधारे विभागाने व आताची नवी ओळख असलेल्या जलसंपदा विभागाने देखील शहापूर तालुक्यात भातसा धरण बांधले या धरणाला दोन कालवे जोडलेले आहेत.यातील उजवा कालव्यातून दुबार पिकांसाठी सिंचन म्हणून पाणी दिले जाते या धरणातून देखील मुंबई व ठाणे शहरासाठी पाणी पुरविले जातआहे. ज्यावेळी मुंबई महापालिकेची धरणं उन्हाळ्यात तळ गाठतात तेव्हा तानसा,मोडकसागर,मध्यवैतरणा या धरणांचा भार भातसा जलाशयाला उचलावा लागतो आहे.आणि या चार धरणातून केवळ फक्त मुंबई व ठाणे या महानगरांना अविरत पाणी पुरविले जात आहे.आजच्या घडीला चार महाकाय धरण येथे सरकारने उभी केली आहेत या धरणांसाठी आपलं योगदान देणाऱ्या स्थानिक भूमिपुत्रांच्या जागा या धरणं उभारताना धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेल्या धरणासाठी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना पैकी काही शेतकऱ्यांच्या पोरांना प्रकल्पग्रस्त म्हणून नोकऱ्या मिळाल्या खऱ्या पण यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला सरकारचे काही वर्ष उंबरठे झिजवावे लागले.ही वस्तुस्थिती आहे.यातील बहुतांश प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांची फरफट आजही नोकरीसाठी दिसत आहे.तर त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सरकारच्या लालफितीच्या कारभारामुळे गेली कित्येक वर्ष रखडलेला दिसतो आहे.

स्वतः पाण्यासाठी वणवण भटकायचे रोजीरोटीसाठी शहरांकडे स्थलांतर करायचं अशी अवस्था स्थानिकांची आहे.आपलं हक्काचं तालुक्यातलं पाणी शहरांना दयायचं हे दातृत्व फक्त शहापूरनं दाखवलं आहे.लगतच्या शहराला पिण्यासाठी पाणी पुरवलं पाहिजे एवढं मोठं आभाळा एवढं उदार मनं शहापूर तालुक्याचं आहे हे दातृत्व स्थानिकाचं आहे.सरकारसाठी शहापूरकर भूमिपुत्रांनी दिलेलं हे मोलाचं योगदान कसं विसरता येईल एकिकडे पाणी शहरांना दिलं तर दुसरीकडे त्यापाठोपाठ शहरांतील वाढती लोकसंख्येचा भार देखील या तीसऱ्या मुंबईला म्हणजेचं शहापूरला सोसवा लागत आहे. अगदी पाणीच काय पण हिरव्यागार असा ताजा भाजीपाला पुरविण्याचं काम शहापूरनं केलं आहे.सांगितलं तरं अगदी नवल वाटेल पण शहापूरची भेंडी ही सातासमुद्रापार पोहचली आहे.युरोप मध्ये एक्सपोर्ट होणारी भेंडी ही शहापूर मधून जाते हे मोठं कौतुकास्पद असं आहे. ठाणे जिल्हयात भाताचं कोठार म्हणून शहापूरची ओळख आहे. इथला तांदूळही प्रसिध्द आहे.परंतु अलीकडच्या काळात नवनवीन रस्ते प्रकल्पांसाठी धरणांच्या बांधकामासाठी शहापूरच्या सहयाद्री पर्वतरांगाचे जंगल भुईसपाट केले जात आहेत.या सिमेंट कॉक्रीटीकरणच्या जंगलामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.तर वन्यजीवांची घुसमट होत आहे. एकिकडे सहुबाजूने पर्यावरणाचे लचके तोडले जात असल्याने निसर्गप्रेमी व वन्यजीव प्रेमींमध्ये कमालीची हळहळ व चिंता व्यक्त होत आहे.विकास प्रकल्पांच्या नावाखाली हिरव्यागार वृक्षांवर कुऱ्हाडी फिरवल्या जात असल्याने पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.शुद्ध गारेगार हवा व थंड हवामान असणाऱ्या शहापूर मध्ये कधी तापमान वाढतय तर कधी थंडी तर कधी बेमोसमी पाऊस पडतो ही निसर्गाची चक्र बिघडलेली दिसत आहेत.पुढील काळात ग्लोबलवार्मिंग धोका दिसत आहे. हे अस्वस्थ करणारं आहे.

### लोकलमधील प्रसूती प्रकरणात धाडसी कामगिरी
# महिला पोलीस उपनिरीक्षक सोनाली नंदेश्वर यांचा सत्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ–कल्याण लोकलमध्ये प्रसूती करून घेत माणुसकीचा आदर्श घालून देणाऱ्या महिला पोलीस उपनिरीक्षक सोनाली नंदेश्वर यांचे अंबरनाथ रेल्वे स्थानक परिसरात भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला.



लोकल प्रवासादरम्यान एका गर्भवती महिलेला अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर, कोणतीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसताना सोनाली नंदेश्वर यांनी प्रसंगावधान राखत लोकल डब्यातच सुरक्षित प्रसूती करून घेतली होती. त्यांच्या या धाडसी व माणुसकीपूर्ण कृतीमुळे आई व नवजात बाळाचे प्राण वाचले होते. या घटनेचे सर्वत्र कौतुक होत असून समाजातील विविध घटकांकडून त्यांचा सन्मान करण्यात येत आहे.

**लोकल प्रवासादरम्यान एका गर्भवती महिलेला अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर, कोणतीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसताना सोनाली नंदेश्वर यांनी प्रसंगावधान राखत लोकल डब्यातच सुरक्षित प्रसूती करून घेतली होती.**

या सत्कारप्रसंगी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष अभिजीत धुरत, स्टेशन मॅनेजर रामेश्वर मीना, सामाजिक कार्यकर्ते विशाल कुरकुटे, मनोज जैन, मंगेश मगरे यांच्यासह दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिला पोलीस उपनिरीक्षक सोनाली नंदेश्वर यांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा व समाजभानाचे विशेष कौतुक करत अशा अधिकाऱ्यांचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

# युवा दिनी जिजाऊ-विवेकानंदांना अभिवादन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हा परिषद ठाणे येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्ताने हा दिवस राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात समाजात वाढत चाललेल्या अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेतली. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान लक्षात घेता, नशामुक्त समाजनिर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या प्रसंगी प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण विभाग) संजय बागुल, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब

**समाजात वाढत चाललेल्या अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती**

**अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा**

राक्षे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, उपमुख्य व लेखा वित्त अधिकारी अंजली अंबेकर, सहाय्यक गट विकास अधिकारी (ग्रामपंचायत) पंडित राठोड यांच्यासह जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी नशामुक्त, निरोगी व सक्षम भारत घडविण्यासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प करण्यात आला.

# भविष्यवेध



**मंगळवार**
**१३ जानेवारी २०२६**

**मेष**
मित्रासोबत संध्याकाळी बाहेर जाण्याचा बेत आखाल आणि दिवसभर आनंदी ठेवेल. तुम्ही कामावर परिश्रमपूर्वक काम कराल. एखाद्या सुंदर ठिकाणी फिरायला जाल, यामुळे तुमचे नाते मजबूत होईल.

**वृषभ**
विद्यार्थी आज एखादा विशिष्ट विषय समजून घेण्यासाठी त्यांच्या वरिष्ठांकडून मदत घेतील. तुमच्या पालकांसोबत बसून भविष्यातील योजनांवर चर्चा कराल. जर काही हरवण्याची चिंता वाटेल.

**मिथुन**
आजचा दिवस चांगला जाईल. तुमच्या कारकिर्दीला एक नवीन वळण मिळेल आणि ते फायदेशीर ठरेल तुम्ही अशा व्यक्तीला भेटाल ज्याच्याशी तुमची घनिष्ठ मैत्री होऊ शकते.

**कर्क**
एखाद्याच्या बोलण्याने तुम्ही प्रभावित व्हाल आणि आज तुम्ही अनावश्यक कामांमध्ये व्यस्त असाल. समस्यांनी दबून जाण्याऐवजी, शांत मनाने त्या सोडवण्याचा प्रयत्न करा.

**सिंह**
जवळचा मित्र एका छान संध्याकाळचे नियोजन करून तुमचा दिवस उजळवेल. आज तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही; तुम्हाला स्वतःबद्दल खूप बरे वाटे. दिवस चांगला जाईल.

**कन्या**
तुम्हाला नवीन माहिती मिळेल जी तुमच्या भविष्यासाठी फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला आळस आणि आळस सोडून तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.

**तुळ**
अफवांकडे दुर्लक्ष करा आणि तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करा. नक्कीच यश मिळेल. आज तुम्हाला व्यवसायात खूप काळजीपूर्वक आणि गांभीर्याने काम करण्याची आवश्यकता आहे.

**वृश्चिक**
तुम्ही व्यावहारिक असाल आणि तुमचा संतुलित दृष्टिकोन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. लोक तुमच्याशी दयाळूपणे वागतील. एकांतात किंवा धार्मिक स्थळी थोडा वेळ घालवा.

**धनु**
काही कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याबद्दल तुम्हाला आनंद होईल. लोकांच्या मतांमुळे आणि तुमच्याबद्दल बोलल्या जाणाऱ्या गोष्टींमुळे तुम्ही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असाल. पण घाबरू नका.

**मकर**
भूतकाळातील चुका पुन्हा न करू नका, काळजी घ्यावी लागेल. तुमचे आयुष्य पुढे जाईल. नवीन जबाबदाऱ्यांसाठी स्वतःला तयार कराल. शांतीने निर्णय घ्या.

**कुंभ**
तुमच्या मुलाच्या करिअरच्या समस्या अनुभवी आणि जाणकार व्यक्तीच्या मदतीने सोडवू शकाल. काही प्रतिकूल परिस्थिती उद्भवू शकते.

**मिन**
इतरांशी संवाद साधताना तुमचा राग नियंत्रित करा. तुम्हाला नवीन माहिती मिळेल. तुम्ही फिरायला जाऊ शकता. तुमचे नाते मजबूत होईल.



दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १३ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १९८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

## समतोल प्रचारातून सशक्त लोकशाही

लोकशाही ही केवळ मतदानाच्या दिवशी व्यक्त होणारी प्रक्रिया नाही, तर ती सतत चालणारा जनसंवाद आहे. या संवादाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे प्रचार. प्रचाराच्या माध्यमातून राजकीय पक्ष, उमेदवार आणि लोकप्रतिनिधी आपली भूमिका, धोरणे आणि विकासदृष्टी जनतेसमोर मांडतात. मात्र हा प्रचार जर असंतुलित, आक्रमक किंवा दिशाभूल करणारा ठरला, तर लोकशाहीच्या मुळावर घाव घालण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच आजच्या काळात समतोल प्रचारातून सशक्त लोकशाही हा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

समतोल प्रचाराचा पहिला आधार म्हणजे मुद्देसूद आणि सकारात्मक मांडणी. निवडणूक प्रचारात विकासकामे, योजना, स्थानिक प्रश्न, रोजगारनिर्मिती, शिक्षण व आरोग्य यांसारख्या मूलभूत विषयांवर चर्चा होणे अपेक्षित आहे. व्यक्तीगत आरोप, टीकाटिप्पणी किंवा विरोधकांना बदनाम करण्याचे राजकारण अल्पकालीन फायद्याचे असले, तरी दीर्घकालीन लोकशाहीसाठी घातक ठरते. जेव्हा प्रचार धोरणांवर केंद्रित असतो, तेव्हा मतदाराला पर्यायांची तुलना करता येते आणि तो विवेकपूर्ण निर्णय घेऊ शकतो.

दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे नैतिकता आणि नियमपालन. प्रचार हा मुक्त असावा, पण अनियंत्रित नव्हे. समान संधी, खर्चमर्यादा, भाषेचा संयम आणि कायद्याचे पालन यामुळेच प्रचाराला शिस्त मिळते. या संदर्भात भारतीय निवडणूक आयोग यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आदर्श आचारसंहितेमुळे प्रचारात समता येते आणि सामान्य मतदाराचा विश्वास अबाधित राहतो. नियम मोडून मिळवलेले मत लोकशाहीला कमकुवत करते, तर नियम पाळून मिळवलेला जनसमर्थन लोकशाहीला बळकटी देतो.

तिसरा पैलू म्हणजे डिजिटल प्रचाराचा वाढता प्रभाव. सोशल मीडिया, व्हॉट्सअ‍ॅप, यूट्यूब आणि अन्य डिजिटल माध्यमांमुळे प्रचार अधिक व्यापक आणि जलद झाला आहे. मात्र याच माध्यमांमुळे अफवा, अर्धसत्ये आणि खोट्या बातम्यांचा प्रसारही वाढला आहे. समतोल प्रचारासाठी डिजिटल माध्यमांचा वापर माहिती देण्यासाठी, संवाद साधण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी व्हायला हवा. द्वेष पसरवणे किंवा समाजात फूट पाडणे हा प्रचाराचा उद्देश असू नये.

चौथा महत्त्वाचा घटक म्हणजे मतदारांची जागरूक भूमिका. प्रचार कितीही प्रभावी असला, तरी शेवटचा निर्णय मतदाराचाच असतो. भावनिक घोषणा, आकर्षक आश्वासने किंवा व्यक्तीपूजा यापेक्षा वास्तववादी योजना, पूर्वीची कामगिरी आणि भविष्यातील अंमलबजावणीची क्षमता तपासणे गरजेचे आहे. प्रश्न विचारणारा, माहिती पडताळणारा आणि मतदानाचा हक्क जबाबदारीने वापरणारा मतदारच लोकशाहीचा खरा रक्षक असतो.

समतोल प्रचाराचा आणखी एक पैलू म्हणजे सामाजिक सलोखा. प्रचाराच्या काळात जात, धर्म, भाषा किंवा प्रदेश यांच्या आधारे समाजात तणाव निर्माण होऊ नये. लोकशाही विविधतेवर उभी आहे; ती फूट पाडून नव्हे, तर समावेशकतेतून सशक्त होते. प्रचारात संयमित भाषा आणि समन्वयाचा सूर राहिला, तर निवडणुकीनंतरही समाजात स्थैर्य टिकते.

एकूणच, प्रचार हा संघर्ष नसून संवादाचा उत्सव असायला हवा. सत्य, संयम, समता आणि सकारात्मकतेवर आधारित प्रचारातूनच लोकशाही अधिक सशक्त बनते. जबाबदार नेते, नियमपालन करणारी यंत्रणा आणि विवेकी मतदार—या तिन्हींच्या समन्वयातूनच समतोल प्रचारातून सशक्त लोकशाही प्रत्यक्षात उतरू शकते.

## जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांना १५ दिवसांची मुदतवाढ

### १५ फेब्रुवारीपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आज महत्त्वाचा निर्णय झाला. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील १२ जिल्हा परिषदां आणि सुमारे 125 पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्यास परवानगी दिली आहे. यामुळे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या निवडणूक प्रक्रियेला अखेर गती मिळणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयात याचिका दाखल करून मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय तयारीतील अडचणी आणि मनुष्यबळाच्या मर्यादा यांचा हवाला दिला होता. याच कारणांमुळे ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे शक्य नसल्याचे सांगत, १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची विनंती आयोगाने केली होती.

या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदां आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुका कोणत्याही अडथळ्याशिवाय पुढे नेल्या जाऊ शकतात. त्यामुळे या सर्व ठिकाणी निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

मात्र, आरक्षणासंदर्भातील कायदेशीर पेच प्रलंबित असलेल्या उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुकांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. या जिल्ह्यांबाबत पुढील दिशा ठरवण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी स्वतंत्र सुनावणी होणार आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या निर्णयामुळे राज्यातील काही भागांत प्रशासकीय राजवटीऐवजी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून कारभार सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, उर्वरित जिल्ह्यांतील निवडणुकांचे भवितव्य २१ फेब्रुवारीच्या सुनावणीनंतरच स्पष्ट होणार असून, त्याकडे राज्यभरातील राजकीय पक्षांचे आणि नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## शिवतीर्थावर महायुतीची विराट सभा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई** : ठाकरे बंधूंच्या सभेनंतर आज महायुतीची विराट जाहीर सभा मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर पार पडली. या सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या सभेत मुंबईचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवत, "विकास विरुद्ध अपयशी राजकारण" असा स्पष्ट संदेश देण्यात आला.

सभेची सुरुवात करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेत शिवतीर्थ आणि शिवसेनेच्या अतूट नात्याचा उल्लेख केला. शिवाजी पार्क परिसरात असलेल्या तीन महापुरुषांच्या साक्षीने ही सभा होत असून, ही केवळ प्रचारसभा नसून परिवर्तनाची सभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काल याच मैदानावर झालेल्या सभेत टीका-टोमणे झाले असले, तरी त्याला उत्तर देण्याऐवजी कामाचा लेखाजोखा आणि पुढील पाच वर्षांत मुंबईसाठी कोणती दिशा असेल, हे जनतेसमोर मांडणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

"फक्त विकास आणि विकास हाच महायुतीचा अजेंडा आहे," असे ठामपणे सांगताना, निवडणुकीच्या काळात होणाऱ्या सभांवरून त्यांनी नाव न घेता राज ठाकरे यांच्यावर टोला लगावला. काही लोकांना निवडणुका आल्या कीच मराठी माणूस आठवतो, इतरवेळी नेटफ्लिक्स आणि निवडणूक आली की पॉलिटिक्स एवढंच कळतं, अशी टीका त्यांनी केली. मराठी माणसाचे अस्तित्व कधीही धोक्यात नव्हते, आजही नाही आणि उद्याही नसेल, असा ठाम दावा त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मुंबईतील पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, पाणीपुरवठा, कचरामुक्त शहर, किनारी रस्ता, मेट्रो प्रकल्प आणि पुनर्विकास योजनांचा उल्लेख करत गेल्या काही वर्षांत विकासाला गती मिळाल्याचे सांगितले. "मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून तिचा विकास थांबता कामा नये. विकासाच्या या प्रवाहाला पुढे नेण्यासाठी महायुतीला बळ द्यावे," असे आवाहन त्यांनी केले. निवडणूक ही केवळ सत्तेची नव्हे, तर मुंबईच्या भवितव्याची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सभेत महायुतीच्या सर्व घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबईच्या विकासासाठी एकत्र येत महायुतीचा भगवा फडकवण्याचा एकजुटीचा संदेश देण्यात आला. ठोस उपाययोजना, स्पष्ट विकासदृष्टी आणि आगामी काळातील निर्णयक्षम नेतृत्व यावर भर देत, या सभेमुळे मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला नव्याने धार मिळाल्याचे चित्र दिसून आले.

## अदानींची प्रगती दाखवून मराठी माणसांचे प्रश्न कसे सुटणार ?

### प्रकाश महाजन यांची राज ठाकरे बंधूवर टीका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मुंबई महापालिका निवडणूक आणि मराठी माणसांच्या प्रश्नांवर कोणतीही योजना सादर न करता गौतम अदानींची प्रगती पुस्तक मनसे प्रमुख राज ठाकरेंनी मराठा माणसाला भ्रमित केलं, अशी खरमरीत टीका शिवसेना प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी केली. ठाणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अदानींच्या प्रगतीशी मराठी माणसांना काही देणंघेणं नाही, त्यांचे मूलभूत प्रश्न कालच्या शिवतीर्थावरील सभेत अनुत्तरीत राहिले, असा टोला महाजन यांनी लगावला.

महाजन म्हणाले की, काल शिवतीर्थावर कौटुंबिक सोहळा झाला. त्यात राज ठाकरेंचे भाषण म्हणजे वक्तृत्व कलेचा उत्तम नमुना होता. कालच्या सोहळ्याला मराठी माणसाच्या अस्मितेला जोडण्याचे केलेले काम निंदनीय असल्याचे ते म्हणाले. घसरत चाललेली राजकीय पत वाचवण्यासाठी केलेला हा खटाटोप होता, असा घणाघात महाजन यांनी ठाकरेंवर केला. राज ठाकरे भाषणात अदानींवर घसरले, अशी टीका महाजन यांनी केले. जे अदानी शरद पवारांना मार्गदर्शक मानतात. अदानी सहकुटुंब राज ठाकरेंच्या घरी भोजनासाठी जातात. मग राज ठाकरेंनी अदानींवर केलेली टीका शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना मान्य आहे का, असा सवाल महाजन यांनी यावेळी केला. अदानींनी मागील १०-१२ वर्षात प्रगती केली, या राज ठाकरेंच्या दाव्यावर महाजन म्हणाले की राज यांच्या मातोश्री बिल्डरची प्रगती केव्हा झाली. तो त्यांनी आठवायला हवा. युतीची सत्ता असताना मातोश्री बिल्डरची प्रगती झाली. त्यावेळेस राज यांनी मायकल जॅक्सनला मुंबईत आणले होते. पंचवीस वर्षात तुमची किती प्रगती झाली याचं राज ठाकरेंनी स्मरण करायला हवं, असे महाजन म्हणाले.

उबाठा मनसे जागा वाटपात संदीप देशापांडेला सोबत घेऊ नका अशी उद्धव ठाकरेंची मागणी होती, मात्र काल संदीप देशपांडे यांना भाषणाची संधी देणं हा राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंवर उगवलेला सूड असल्याचे महाजन म्हणाले. संदीप देशांपाडे याने कालच्या भाषणा ठाकरे ब्रँड नाही असे म्हटलं नंतर तो ब्रँड नाही तर विचार आहे, असे सांगून देशपांडेने सारवासारव केली, असे महाजन म्हणाले. महापालिका निवडणुकीत जर पराभव झाला तर तो ठाकरे ब्रँडचा नसून विचारांचा आहे, अशी मखलाशी देशपांडेने केल्याचे महाजन म्हणाले. मराठी माणसांची काळजी घ्यायला देवेंद्र फडणवी, एकनाथ शिंदे आणि अजित पवार आहेत, शरद पवार आहेत, सुप्रिया सुळे असे अनेक नेते आहेत. ठाकरेंकडे मराठी माणसाचा ठेका दिलेला नाही, अशी टीका महाजन यांनी केली.

> ठाकरेंच भाषण मराठी माणसाला भ्रमित करणारं शिवतीर्थावर कौटुंबिक नाट्य सोहळा झाला

## टिटवाळा–बल्याणी परिसरात पुन्हा बेकायदा बांधकामांचा सुळसुळाट

दै.ठाणेजीवनदीपवार्ता

**कल्याण** - मागील वर्षभर एकही बेकायदा बांधकाम उभे न राहिलेल्या अ प्रभागातील टिटवाळा, बल्याणी, मांडा व बनेली परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून भूमाफियांकडून बेसुमार बेकायदा बांधकामे सुरू झाली आहेत. या



बांधकामांवर कारवाई करण्यात अ प्रभागाचे विद्यमान साहाय्यक आयुक्त अपयशी ठरत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून होत आहेत. यापूर्वी अनधिकृत ठरवून तोडलेली बांधकामेही पुन्हा उभारली जात असल्याने रहिवाशांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. डोंबिवली पश्चिमेनंतर सर्वाधिक हरितपट्टा असलेला टिटवाळा परिसर हा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महत्त्वाचा भूभाग असून, बेकायदा बांधकामांमुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## ठाण्यात 32 प्रभागांत चार, तर एका प्रभागात तीनवेळा मतदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी ठाणे महापालिका क्षेत्राचे एकूण ३३ प्रभागांमध्ये विभाजन करण्यात आले असून १३१ नगरसेवकांच्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे. प्रभाग क्रमांक १ ते २८ आणि ३० ते ३३ या ३२ प्रभागांमध्ये प्रत्येकी चार जागांसाठी मतदान होणार असून प्रभाग क्रमांक २९ मध्ये तीन जागांसाठी मतदान होणार असल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी दिली. ही निवडणूक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या (EVM) सहाय्याने घेण्यात येणार असून, संबंधित प्रभागानुसार बॅलेट युनिटवर तीन किंवा चार मतपत्रिका उपलब्ध असणार आहेत.

प्रत्येक मतदाराला वरीलप्रमाणे सर्व जागांसाठी मतदान करणे बंधनकारक असणार आहे. म्हणजेच ३२ प्रभागांमध्ये चार मते, तर प्रभाग क्रमांक २९ मध्ये तीन मते नोंदविल्याशिवाय मतदान प्रक्रिया पूर्ण होणार नाही. प्रत्येक जागेसाठी उमेदवारांसोबतच 'नोटा' (NOTA - वरीलपैकी एकही नाही) हा पर्यायही मतदारांना उपलब्ध असणार आहे. मतदारांनी सर्व जागांसाठी मतदान पूर्ण केल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातून शिट्टीचा आवाज येईल आणि यंत्रावरील दिवे बंद होतील. त्यानंतर मतदान यंत्र पुढील मतदारासाठी पुन्हा उपलब्ध होईल.

### केडीएमसी निवडणूक पार्श्वभूमीवर

## क्राईम ब्रँचची कारवाई दोन हातभट्ट्या उद्ध्वस्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्याचे शहर पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि अपर पोलिस आयुक्त डॉ. पंजाबराव उगले यांच्या निर्देशानुसार क्राईम ब्रँच, कल्याण युनिटने मोठी कारवाई केली.

क्राईम ब्रँचचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित शिंदे व त्यांच्या पथकाने वडवली-शिरढोण गावाच्या सीमेवरील नदीकाठावर तसेच घेसर गावाच्या शिवारात सुरू असलेल्या सरमाडी दारूच्या दोन अवैध हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या. या कारवाईत हातभट्टी निर्मितीसाठी वापरण्यात येणारे सुमारे ७ लाख ५० हजार रुपये किमतीचे साहित्य व रासायनिक पदार्थ (वॉश) जागीच जाळून नष्ट करण्यात आले.

गुप्त माहितीनंतर ही धाड टाकण्यात आली असून, ग्रामीण भागात तयार होणारी अवैध दारू शहर व परिसरात वितरित केली जात असल्याचे उघड झाले आहे. निवडणूक काळात अशा बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

## दुर्गंधीच्या राजकारणात अडकले मतदान

### एमआयडीसीतील नागरिकांचा सत्ताधाऱ्यांना इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण–डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकास, सुविधा आणि आश्वासनांची चर्चा सुरू असताना, डोंबिवली एमआयडीसी निवासीतील नागरिकांनी थेट मतदानावर बहिष्काराचा इशारा देत प्रशासन आणि राजकीय पक्षांची कोंडी केली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाळी गटारात शौचालयाचे मलमूत्र मिसळल्याने निर्माण झालेल्या तीव्र दुर्गंधीमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, हा प्रश्न केवळ नागरी सुविधांचा न राहता राजकीय उदासीनतेचे प्रतीक ठरत आहे.

एमआयडीसी फेज दोन लगत असलेल्या 'ओम सदिच्छा', 'ओमकार छाया', 'माणिकरत्न' आणि 'गौरी नंदन' या चार गृहनिर्माण वसाहतींमधील रहिवाशांनी केडीएमसी, एमआयडीसी प्रशासन तसेच विविध राजकीय पक्षांच्या



**डोंबिवली एमआयडीसी निवासीतील नागरिकांनी थेट मतदानावर बहिष्काराचा इशारा**

पदाधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या. प्रत्यक्ष पाहणी होऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. विशेष म्हणजे, शौचालयाच्या दुर्गंधीबरोबरच आजूबाजूच्या रासायनिक कंपन्यांमधून येणाऱ्या विषारी वायूंमुळे आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर सुमारे २०० मतदारांचा मतदान बहिष्काराचा इशारा हा सत्ताधाऱ्यांसाठी राजकीय धोक्याची घंटा मानला जात आहे. प्रभाग क्रमांक १९ मधील अ, ब आणि क वार्ड बिनविरोध झाले असताना, केवळ 'ड' वार्डात भाजप आणि मनसे यांच्यात लढत होणार आहे. मात्र नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे—मतं हवीत, पण प्रश्न सोडवायची जबाबदारी कुणाची?

निवडणुकीच्या तोंडावर आश्वासनांची बरसात करणाऱ्या पक्षांसमोर एमआयडीसीतील ही समस्या विकासाच्या दाव्यांची परीक्षा ठरणार आहे. जर दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्याच्या प्रश्नांवर तातडीची कारवाई झाली नाही, तर हा बहिष्कार केवळ इशाराच न राहता, राजकीय नाराजीचे प्रत्यक्ष रूप घेऊ शकतो, अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे.

## बदलापूर शहरात 'राष्ट्रीय कीर्तन महोत्सवा'ची सांगता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : अंबरनाथ तालुका आध्यात्मिक उत्सव समितीच्या वतीने आमदार किसन कथोरे यांच्या नेतृत्वाखाली २३ वर्षापासून अखंड सुरू असलेल्या 'राष्ट्रीय कीर्तन महोत्सव २०२६'ची बदलापूर शहरात भक्तिमय वातावरणात उत्साहात सांगता झाली. वारकरी संप्रदायाच्या महान परंपरेचा वारसा जपत सातदिवसीय महोत्सवामुळे संपूर्ण बदलापूरनगरी भक्ती, नामस्मरण आणि संतविचारांनी भारावून गेली होती. महोत्सवाची सुरुवात विघ्नहर्ता श्री गणरायाची विधिवत पूजा-अर्चा, टाळ, वीणा व मृदंग पूजनाने झाली. पहिल्याच दिवशी पैठण येथील श्रीनाथ संस्थानाधिपती, संत एकनाथ महाराजांचे १४वे वंशज व उत्तराधिकारी ह.भ.प. डॉ. पुष्कर महाराज गोसावी यांच्या सुश्राव्य व भावस्पर्शी कीर्तनाने भक्तिरसाचा ओघ सुरू झाला. त्यांच्या प्रभावी वाणीतून संतविचारांचे मोलाचे चिंतन घडले. महोत्सवाच्या सातव्या दिवशी शनिवारी २०० मृदंग वादकांच्या



एकत्रित सादरीकरणाने हरिपाठाचा जयघोष संपूर्ण परिसरात निनादला. हजारो भाविकांच्या उपस्थितीत झालेला दीपोत्सव हा सोहळा नेत्रदीपक ठरला. याचवेळी पंढरपूर येथील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. भानुदास महाराज चातुरमासे यांनी विठ्ठल नामाची महती सांगत 'विठ्ठल नामस्मरणातून प्रत्येक कार्य सुख-समाधान देणारे ठरते', असा संदेश दिला. दिंडीनंतर मांगरूळ येथील ह.भ.प. वासुदेव महाराज पाटील यांच्या रसाळ काल्याच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुचिता घोरपडे, उपनगराध्यक्ष प्रियंका दामले तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिस्तबद्ध पद्धतीने झालेल्या काल्याच्या महाप्रसादाने या भक्ती सोहळ्याची सांगता झाली. हा महोत्सव केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता वारकरी संस्कृती, सामाजिक एकात्मता आणि जनसामान्यांच्या श्रद्धेचे प्रतीक ठरल्याची भावना आमदार किसन कथोरे यांनी यावेळी व्यक्त केली.

# खर्डी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण:** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 12 जानेवारी 2020 रोजी भारताचे थोर तत्त्वज्ञ आणि तरुणांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १२ जानेवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजने तर्फे राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ' रन फॉर स्वदेशी'* या संकल्पनेवर आधारित महाविद्यालयात तसेच दळखण गावात कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर स्वयंसेवकांनी विवेकानंदांच्या विचारांवर आधारित प्रेरणादायी विचार मांडले. कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल सोनावणे यांनी "उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका" या संदेशातून युवकांना आत्मविश्वास, शिस्त व राष्ट्रसेवेची प्रेरणा दिली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी युवकांचे समाजातील कर्तव्य, राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका व स्वामी विवेकानंदांच्या शिकवणीचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रम अधिकारी प्रा. रसिका सकपाळ यांनी स्वयंसेवकांनी कश्याप्रकारे समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा यावर मार्गदर्शन करून उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष मा.रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.




# एकविरा भव्य पदयात्री पालखी सोहळ्याचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील)** : आई एकविरा प्रतिष्ठान, भातसई या प्रतिष्ठानच्या वतीने एकविरा भव्य पदयात्री पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

वासिंद परिसरातील भक्तांना पदयात्राद्वारे आई एकविरा मातेचे दर्शन व्हावे यासाठी आई एकविरा प्रतिष्ठान, भातसई या प्रतिष्ठानच्या वतीने गांवदेवी मंदिर भातसई ते श्री क्षेत्र कार्ला या एकविरा भव्य पदयात्री पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.शनिवार 17 ते बुधवार 21 जानेवारी 026 दरम्यान हा पालखी सोहळा होणार असून आई एकविरा भक्तांनी या पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन प्रतिष्ठानचे संस्थापक अशोक जाधव, तुकाराम खारीक सर तसेच प्रतिष्ठान व आई एकविरा उत्सव कमिटी पदाधिकारी, सदस्य यांनी केले आहे.

# मानधनावर सेवानिवृत्त शिक्षक नको डी.एड-बी.एड बेरोजगारांना संधी द्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण:** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण अव्वल सचिवांच्या ४ नोव्हेंबर २०२५ व शिक्षण संचालक प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या कडील १९ नोव्हेंबर २०२५ च्या परिपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे सेवानिवृत्त झालेल्या वयाच्या ७० वर्षाखालील निवृत्ताना २०००० रू मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यासाठी स्थानीक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधीकारी यांनी काढली आहेत.

महाराष्ट्र राज्यात सुमारे १ लाखाच्या वर डीएड, बी एड प्रशिक्षीत पदवीधर युवक नोकरी विना बेकार आहेत त्यांची फरपट होत आहे म्हणून महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अध्यक्ष शिवानंद भरले व मराठावाडा विभागीय अध्यक्ष सुभाष जिरवनकर यांनी शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांच्याकडे समक्ष भेट घेऊन सेवानिवृत्त शिक्षकांना प्रपंचााला हातभार म्हणून महीना ४० ते ६० हजार रुपये पेन्शन मिळतो परंतु राज्यातील डीएड बी एड पदविधराचें हाल आहे त्यांची स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील रिक्त शिक्षक पदावर २०००० रू मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावीत असे मागणी केली आहे

त्याच बरोबर राज्यातील सेवानिवृत्त शिक्षकाचं ८५० कोटी रक्कम ग्रॅज्यूटी व पेन्शन विक्री रक्कम गेल्या वर्षभरात सरकारने थकवले आहेत तेही सरकार कडून प्राप्त करून घ्यावी अन्यथा ६ महिन्यापेक्षा जास्त दिवस थकवून रकमेवर बँकेच्या दराने व्याजासाठी उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल असेही सांगितले आहे.

# टहारपूर ग्रामपंचायत उपसरपंचपदी देविदास भोईर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद:** वासिंद जवळील टहारपूर येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी देविदास भोईर हे विजयी झाले आहेत.

ग्रामपंचायतीचे कार्यरत उपसरपंच यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. त्यामुळे या रिक्त उपसरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्य कमलाकर निपूर्ते व देविदास भोईर या दोघांनी नामनिर्देशांक अर्ज भरल्याने ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये कमलाकर निपूर्ते यांना 3 तर देविदास भोईर यांना 7 सदस्यांनी मतदान केल्याने त्यांची उपसरपंचपदी निवड झाली आहे.

सदर, ग्रामपंचायत अंतर्गत वेडवहाळ, टहारपूर, डिंभे व पालिचापाडा या गावांचा समावेश असून एकूण दहा सदस्यसंख्या आहे. तर या झालेल्या निवडीने येथील नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे नवनियुक्त उपसरपंच देविदास भोईर यांनी म्हटले आहे. नवनिर्वाचित उपसरपंच देविदास भोईर यांचे या परिसरातून अभिनंदन होत आहे.

# निवडणूककामी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांचा टपाली मतदानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समितीमध्ये टपाली मतदानासाठी रांगाच रांगा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : निवडणूककामी कार्यरत असलेल्या व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर काम करणाऱ्या सरकारी अधिकारी कर्मचारी तसेच पोलीस यांना त्यांचा मतदानाचा अधिकार बजावता यावा यांनी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या टपाली मतदानाला अधिकारी कर्मचारी यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी महापालिकेच्या 9 प्रभाग समितीनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक केली असून याच ठिकाणी टपाली मतपत्रिका देखील स्वीकारण्यात येत आहे. दि.11 जानेवारी 26 पर्यंत मतदानाचे दिवशी कार्यरत असणाऱ्या 1292 कर्मचारी तर 653 पोलीस कर्मचारी यांच्याकडून टपाली मतपत्रिका प्राप्त झाल्या आहेत. टपाली मतदानाची प्रक्रिया ही दि.12 जानेवारी 2026 पर्यंत सुरू राहणार असल्याने निवडणूक कामी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्वच प्रभाग समिती मध्ये रांगा लागल्या होत्या.



**पाली मतदानाची प्रक्रिया ही दि.12 जानेवारी 2026 पर्यंत सुरू राहणार असल्याने निवडणूक कामी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्वच प्रभाग समिती मध्ये रांगा लागल्या होत्या**

टपाली मतदान सुविधा केंद्र लोकमान्य सावरकर नगर प्रभाग समितीमधील निवडणूक निर्णय अधिकारी सर्जेराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली टपाली मतदारांसाठी आवश्यक सर्व प्रकारचे सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रभाग क्रमांक 6, 13, 14, 15 मध्ये सायंकाळी 6.30 वाजता उत्स्फूर्त प्रतिसादामुळे रांगा लागल्या होत्या. आपले मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. टपाली मतपत्रिका स्वीकारताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जात असून सुरक्षितता, नोंदणी व सीलबंद साठवणूक याबाबत विशेष दक्षता घेण्यात आली आहे. तरी निवडणूककामी कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले टपाली मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सर्जेराव पाटील यांनी केले आहे.

# बालमहोत्सवात भिवंडीतील बालसुधारगृहाच्या मुलांची नेत्रदीपक कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** महाराष्ट्र शासन आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय यांच्यावतीने अंबरनाथ येथील ऑर्डनन्स फॅक्टरीच्या मैदानात ठाणे जिल्हा पातळीवर चाचा नेहरू बालमहोत्सव २०२५-२६ चे आयोजन केले होते. या बालमहोत्सवात भिवंडीतील बालसुधारगृहातील खेळाडू मुलांनी व मुलींना सहभागी होत प्रथम पारितोषिक मिळवित चांगली कामगिरी बजावली आहे

त्यामुळे भिवंडी बालगृह व निरीक्षण गृहाचे अध्यक्ष तथा ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,संस्थेचे मानद सचिव दिलीप कलंत्री,अधीक्षक अमित गुंजाळ आणि कार्यकारी मंडळ सदस्यांनी गुणवंत खेळाडू चे अभिनंदन केले आहे.

ठाणे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या शासकीय, स्वयंसेवी बालगृह, निरीक्षण गृहातील काळजी व संरक्षणची गरज असलेल्या बालकांसाठी बाल महोत्सवाचे आयोजन केले जाते. या बालगृह निरीक्षण गृहातील बालकांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी, सांघिक भावना निर्माण होण्यासाठी विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला आणि सांस्कृतिक स्पर्धाचे वयोगटानुसार आयोजन केले होते. हा महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवात भिवंडीतील बालगृह व निरीक्षण गृहातील मुलांनी आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी (मोठा गट)
रिले ४०० मिटर (मोठा गट)
गोळा फेक (मोठा गट)
कॅरम (मोठा गट) वकृत्व स्पर्धा
हस्ताक्षर स्पर्धा (मोठा गट) थ्रो बॉल स्पर्धा (मोठा गट)
मुली विभाग- लांब उडी (मोठा गट) वकृत्व स्पर्धा (छोटा गट) वकृत्व स्पर्धा (मोठा गट) समुह डान्स (मोठा गट) या स्पर्धेत उस्फूर्तपणे सहभागी होत आपले कलागुण दाखवीत प्रथम,व्दितीय, तृतीय व सामूहिक अशी विविध प्रकारची बक्षिसे मिळवली आहेत.त्यामुळे बालसुधारगृहातील अधिक्षक, शिक्षक, संस्था पदाधिकारी व सदस्य कार्यकारी मंडळाने विजेते मुल व मुलींचे अभिनंदन केले आहे.



**भिवंडी बालगृह व निरीक्षण गृहाचे अध्यक्ष तथा ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,संस्थेचे मानद सचिव दिलीप कलंत्री,अधीक्षक अमित गुंजाळ आणि कार्यकारी मंडळ सदस्यांकडून गुणवंत खेळाडू चे अभिनंदन**

# भिवंडी महापालिका निवडणुकीत मतदारांमध्ये नागरी समस्यांमुळे उदासीनता

**भिवंडी** : 15 जानेवारी रोजी होणाऱ्या भिवंडी महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा वेग वाढला आहे. निवडणुकीत दुसऱ्या, तिसऱ्यांदा ते सहाव्यांदा निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवार हे नागरी सुविधा देण्यासाठी असमर्थ ठरल्याने मतदारांमध्ये या उमेदवारां विरोधात असंतोष आहे, विकासाच्या मुद्दयांवर प्रचार करणाऱ्या सुशिक्षित आणि उत्साही नवीन उमेदवारांना मतदार पाठिंबा देत असल्याने विद्यमान नगरसेवकांना ही निवडणूक काही प्रमाणात अडचणीचा ठरण्याची शक्यता असल्याचे चित्र दिसत आहे.भिवंडी महापालिका निवडणुकीत मतदारांमध्ये नागरी समस्यां मुळे उदासीनता..

**नवीन चेहऱ्यांना देणार संधी ?**

सन २०११ साली झालेल्या जनगणनेनुसार भिवंडीची लोकसंख्या ७ लाख १२ हजार आहे. तर या निवडणुकीसाठी ६ लाख ६९ हजार ०३३ मतदारांची नोंद झाली असून त्यामध्ये ३ लाख ८० हजार ६४३ पुरुष,२,८८,०९७ महिला आहेत तर इतर ३१३ मतदारांची संख्या आहे. या मतदारांमध्ये दुबार मतदारांची संख्या २७ हजार ३९४ आहे. या दुबार मतदारांच्या नावे पुन्हा मतदान होऊ नये म्हणून त्यावर स्टार मार्क केले असल्याची माहिती भिवंडी महानगरपालिकेच्या निवडणूक कार्यालयाने दिली आहे. १५ जानेवारी रोजी ९० नगरसेवकांसाठी भिवंडी महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. नगरसेवकांच्या काळातील पाच वर्षे आणि प्रशासकीय काळातील चार वर्ष अशा नऊ वर्षाच्या काळात भेडसावणाऱ्या प्रश्नासाठी नगरसेवकांनी आणि राजकीय पक्ष पदाधिकाऱ्यांनी केलेले काम हा या निवडणुकीचा कळीचा मुद्दा ठरला आहे. त्यामुळे नवीन चेहऱ्यांच्या उमेदवारांकडे मतदार अपेक्षेने पाहत आहेत.

## नवीन चेहऱ्यांना देणार संधी?



दरम्यान भाजप आणि शिवसेनेने त्यांच्या कामगिरीच्या आधारे तीन-चार विद्यमान नगरसेवकांचे तिकीट रद्द केले आहे आणि नवीन उमेदवार उभे केले आहेत.भाजपच्या ३० पैकी सहा उमेदवारांना बिनविरोध घोषित करण्यात आले आहे.कॅाँग्रेस आणि समाजवादी पक्षासह आरपीआय एकतावादी यांनी देखील त्यांच्या विद्यमान नगरसेवकांसह बहुतेक नवीन उमेदवार उभे केले आहेत. आप पार्टी, लोक हिंद सेना या दोन पक्षासह भिवंडी विकास आघाडी,कोणार्क विकास आघाडी तसेच अपक्ष बंडखोर आणि अपक्ष उमेदवारामुळे या निवडणुकीत अनेक राजकीय पक्षाच्या उमेदवारांना शाह-काटशह मिळणार आहे. गेल्या १०-१५ वर्षांपासून शहरातील मूलभूत समस्या नियोजन करून न सोडविता तीच तीच कामे वारंवार करून काही लोकप्रतिनिधींनी शहरातील समस्या कायम ठेवल्या आहेत अशी प्रतिक्रिया मतदार देत आहेत.

मतदारांमध्ये वाढत्या जागरूकतेमुळे राजकीय पक्षांचे उमेदवारांनी धास्ती घेतली आहे.

महापालिका निवडणुकीत, जनतेला मूलभूत सुविधा पुरवणाऱ्या नगरसेवकाला निवडून दिले पाहिजे. जेव्हा माजी प्रतिनिधी अपेक्षा पूर्ण करू शकत नाहीत तेंव्हा नवीन चेहऱ्यांना संधी देणे शहाणपणाचे आहे असे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

भिवंडी शहरात रस्ते, स्वच्छता आणि स्वच्छ पाणी यासारख्या मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने भिवंडीत नागरी समस्याचा बोजवारा उडाला आहे.

# पाचाड येथे राजमाता जिजाऊ मॉंसाहेबांचा 427 वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड:** रायगड जिल्हा परिषद आणि पाचाड ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक किल्ले रायगड च्या पायथ्याशी असलेल्या राजमाता जिजाऊ मॉंसाहेबांच्या 427 व्या जन्मोत्सव सोहळयाचे आयोजन पाचाड येथील समाधीस्थळी करण्यात आले होते. यावेळी रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ मॉंसाहेबांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून विधिवत पूजन,अभिषेक व महाआरती करण्यात आली.

या प्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, उपविभागीय अधिकारी महाड पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे, गटविकास अधिकारी डॉ.स्मिता पाटील, माजी जि.प सदस्या मानसी दळवी, पाचाड सरपंच सीमा बेंदुगडे यांसह विविध अधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच विविध शिवभक्त संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

# भिवंडीत आचारसंहिता पथकाकडून ८ हजार रुपयांचा मद्यसाठा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** :भिवंडी महापालिका निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असताना शहरात मतदारांना पैसे, दारू व जेवणाचे आमिष दाखवण्याच्या प्रकारांत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाच्या आचारसंहिता पथकाने सतर्क राहून भंडारी कंपाऊंड परिसरात कारमधील मद्यसाठा जप्त करण्याची कारवाई केली. नारपोली येथील दावत चौक परिसरात संशयास्पद कारमध्ये मद्य असल्याची माहिती मिळाल्यानंतर आचारसंहिता पथकाने नारपोली पोलिसांच्या मदतीने इनोव्हा कार (क्रमांक एम.एच. ०४ जे.डी. ११००) ची तपासणी केली. तपासणीदरम्यान सुमारे ८,६०० रुपयांचे विदेशी व देशी मद्य आढळून आले. कार चालक संधीचा फायदा घेत घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी कार जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

# म्हसा यात्रेत रविवारी विक्रमी गर्दी | पोलिसांचा चोख बंदोबस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(दिलीप पवार) :** म्हसा यात्रेच्या निमित्ताने गेल्या अनेक दिवसांपासून विक्रमी गर्दी होत होती.रविवारी सुट्टीच्या दिवशी एकाच वेळी दोन ते तीन लाख भाविक दाखल झाल्याने परिसरात प्रचंड ताण निर्माण झाला होता. काही ठिकाणी दोन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागून तीव्र ट्राफिक जामची परिस्थिती निर्माण झाली होती. अशा कठीण परिस्थितीतही मुरबाड पोलिसांनी संयमाने व नियोजनबद्ध पद्धतीने बंदोबस्त सांभाळत परिस्थिती नियंत्रणात ठेवली.

यात्रेदरम्यान चोरी, मोबाईल स्नॅचिंग यांसारख्या घटना दरवर्षी यात्रेच्या निमित्ताने होत असतात परंतु यावर्षी पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या योग्य नियोजनामुळे या प्रकारांना आळा घालण्यात पोलिसांना यश आले. तसेच या गर्दीत हरवलेली १० ते १५ लहान मुले पोलिसांनी तत्काळ शोधून सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिली





सदरच्या या यात्रेच्या बंदोबस्तासाठी ठाणे जिल्हा ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ.डी. स्वामी साहेब अतिरिक्त पोलीस अधीक्षक मित्तल साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाडचे डी वाय एस पी अनिल लाड यांच्या निरीक्षणाखाली मुरबाड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासोएडके व पोलीस उपनिरीक्षक संदिपान सोनवणे यांनी उत्तम रीतीने नियोजन केले होते. यावेळी पीएसआय जाधव, पीएसआय कामडी व पीएसआयअरमाळकर,हिंदुराव, हवालदार रामा शिंदे तसेच सर्व पोलीस अधिकारी, होमगार्ड अधिकारी अंमलदारांनी समन्वयाने काम करत अथक मेहनत घेतली व उत्कृष्ट कामगिरी बजावली. पोलिसांच्या या सतर्क व प्रभावी कामगिरीमुळे म्हसा यात्रा शांततेत व सुरक्षिततेत पार पडली. डी वाय एस पी अनिल लाड यांनी स्वतः यात्रेत थांबून परिस्थितीवर नियंत्रण ठेवले होते.

गेल्या दहा दिवसापासून चाललेल्या म्हसा यात्रेत होणाऱ्या गर्दीला योग्य त्या सोयी- सुविधा, वाहन पार्किंग व्यवस्था, खाम्बलिंगेश्वर येथील मंदिरामध्ये दर्शन व्यवस्था अतिशय चोखपणे ठेवली होती या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याने मुरबाड मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे साहेब तसेच या भागातील लोकप्रतिनिधी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच म्हसा यात्रेसाठी आलेल्या नागरिकांनी, भाविक बंधू भगिनी यांनी पोलीस प्रशासनाच्या कामगिरीचे कौतुक केले.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024